FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

## पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT 0154217

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: लाप्रवि, मुं, पहिली खबर क्र. FIR No.: ०९, वर्ष Year: २०२२, दिनांक Date: २२/०२/२०२२

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. १९८८, कलमे Sections: 7
   (ii) अधिनियम Act: भा. द. वि., कलमे Sections: 201
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: ...

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day: सोमवार, तारीख पासून Date from: 21/02/2022, वेळ Time: 8:00, तारीख पर्यंत Date to: 22/02/22, वेळ Time: 1:00
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date: 21/02/2022, वेळ Time: 16:00
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 22/22, तारीख Date: 22/02/22, वेळ Time: 12:00

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणचे नाव Address of Occurrence Name: साकीनाका पो. ठाणे, ठिकाणाचे नंबर No. if any: ए/207, गल्ली Ward ..., रस्त्याचे नाव Name of road ...
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: श्रीराम कनोजिया
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: बालचंद कनोजिया
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: ५५ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: 9286725515
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..., दिल्याचा दिनांक Date of Issue ..., दिल्याचे ठिकाण Place of Issue ...
   (f) व्यवसाय Occupation: इस्त्री दुकान
   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste ..., जनजात Sub-Caste ...
   (h) पत्ता Address: गल्ली / वार्ड नं. Ward ..., घर / खाद्य नं. House Name No. ..., फोन / मो. नं. Phone/Mo. No. ..., पॅन नं. PAN No. ..., ओळखपत्र नं. Card No. ...: ५ ज्ञानेश्वरनगर, रमाबाई संपादकीय चौक, मुलं, कुर्ला अंधेरी रोड,
   रस्त्याचे नाव Road: साकीनाका, मुं-७२, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., पो. स्टे. P. Stn. ...
   तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ..., सध्याचा पत्ता Present Address ...

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   प्रकाशकुमार सुरेश पवार, ३२ वर्षे, पोलिस उप निरिक्षक, साकीनाका पो.ठाणे. रा. डी-ए /207, साकीनाका पो. ठाणे वसाहत, कुर्ला मार्ग, साकीनाका, मुं-७२.

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with CamScanner

यातील फिर्यादी श्री. श्रीराम बालचंद कनोजिया, वय ५५ वर्षे, धंदा - इस्त्री दुकान, रा.ठि. न्यु शांतीनगर, राम रहिम कंपाऊंड, सफेद पुल, अंधेरी कुर्ला रोड, साकीनाका, मुंबई - 72 यांचा स्वतंत्र पानावर संगणकृत केलेला जबाब हिच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(मानसिंग वचकल)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि.; मुंबई.

Scanned with CamScanner

फिर्याद                                    दिनांक — २२/०२/२०२२

श्री. श्रीराम बालचंद्र कनोजीया, वय ५० वर्षे, धंदा— धोबी, रा.ठी— न्यु शांतीनगर, रामरहीम कंपाऊंड
सफेदपुल, कुर्ला अंधेरी रोड, साकीनाका, मुंबई. मो— ८२८६७२५५१५

---

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर गेल्या ३० वर्षापासुन रहावयास आहे. माझे कुटूंबात
माझे आई—वडिल, माझी पत्नी व माझी दोन मुले व दोन मुली रहावयास आहेत. मी राहत असलेल्या घर
नमूद ठिकाणी घराचे पुढिल बाजुस गेल्या एक वर्षापासुन धोबीचे/कपडे इस्त्रीचे काम करतो. त्यातुन मिळणाऱ्या
उत्पनावर माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो.

दिनांक २०/०२/२०२२ रोजी रात्री १०:३० वाजताचे सुमारास माझे घराजवळ काही लोकांचे भांडण
झाले. त्यामध्ये माझा मुलगा राहुल याचे डोक्यास मार लागला. तेव्हा मी माझ्या मुलाला घेवून साकीनाका
पोलीस ठाणे येथे तक्रार देणेकरीता गेलो होतो. त्यावेळी तेथिल अधिकारी पीएसआय पवार साहेब यांनी
आम्हाला रात्रभर पोलीस ठाणेत बसवून ठेवले परंतू आमची तक्रार नोंद केली नाही.

पवार साहेबांनी माझ्या मुलाचा मोबाईल माझेकडून काढून घेतला आणि मला सांगीतले की, ''दस
हजार रुपये लेके आओ और मोबाईल लेके जावो'' त्यानंतर आम्ही सर्व घरी आलो दि. २१/०२/२०२२
रोजी मी पवार साहेबांना फोन केला असता त्यांनी ''मला साकीनाका पोलीस ठाणेत मी सांगतलेले पैसे घेवून
ये व मोबाईल घेवून जा'' असे सांगीतले.

मला पवार साहेब यांना पैसे दयावयाची इच्छा नसल्याने मी साकीनाका पोलीस ठाणे येथिल पवार
साहेब यांचे विरुध्द तकार देणेकरीता त्याच दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे आलो.
तेथिल अधिकारी यांनी मला त्यांच्या वरिष्ठांकडे उभे केले. त्यांनी माझेकडे चौकशी करून वरिष्ठांनी पो.नि.
वचकल यांची माझे तकारी बाबत कार्यवाही करणेकरीता नेमणुक केली.

पो.नि वचकल यांनी माझेकडे अधिक चौकशी करुन साकीनाका पोलीस ठाणे येथिल पवार साहेब हे
माझेकडे लाचेची मागणी करीत असल्याबाबत मला लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले. मला मराठी
लिहीता येत नसल्याने मी स्वत: हिंदीमध्ये माझा तकारीअर्ज लिहुन दिला व त्यावर स्वाक्षरी केली. त्यानंतर
पोलीसांनी त्यांचे कारवाईबाबतची सोपस्कर पुर्ण करुन दोन शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची माझेशी
ओळख करून दिली. पो.नि वचकल यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास
दिला. पो.नि वचकल यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि
वचकल यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला. तसेच पो.नि वचकल यांनी पो.नि
लांघी व पडताळणी पथकातील पोलीस अंमलदाराची ओळख करुन दिली व पो.नि वचकल यांनी दिनांक
२१/०२/२०२२ रोजी पंचासमक्ष साकीनाका पोलीस ठाणे या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे
सांगून पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून
होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

त्यानंतर पडताळणी पो.नि. वचकल यांनी पंचनाम्यासाठी आवश्यक बाबींची पुर्तता करून मी, पोनि
वचकल, पो.नि लांघी, दोन पंच व पडताळणी पथक असे दोन वेगवेगळया पोलीस वाहनातून साकीनाका
पोलीस ठाणेचे दिशेने रवाना झालो. आम्ही बालाजी स्पेशालिटी हॉस्पिटल, साकीविहार रोड, साकीनाका या
ठिकाणी आलो असता पोलीसांनी वाहन पार्क केले. त्यानंतर पो.नि. वचकल यांनी मला पुन्हा पडताळणीच्या
वेळी घ्यावयाच्या खबरदारीबाबत सुचना दिल्या व मला पवार साहेब यांना भेटण्याकरीता साकीनाका पोलीस
ठाणे येथे पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच सौ. ज्योती

Scanned with CamScanner

चव्हाण यांचेसह रिक्षाने साकीनाका पोलीस ठाणे येथे जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे आम्ही साकीनाका पोलीस ठाणे येथे रिक्षाने निघालो.

मी व पंच साकीनाका पोलीस ठाणे येथे पोहचलो असता तेथे माझा मोठा मुलगा रोहीत हा देखील आला होता. त्यावेळी मी पवार साहेबांना त्यांचे मोबाईलवर तिन वेळा संपर्क केला परंतु पवार साहेबांनी माझे कॉल कट केले. थोडया वेळानंतर पवार साहेब मोटार सायकलवरुन साकीनाका पोलीस ठाणे येथे आले व दहा ते पंधरा मिनीटांनी ते माझ्या जवळ आले व मला एकटयाला घेवून पोलीस ठाणेच्या बाजूच्या इमारतीच्या दुस–या मजल्यावर घेवून गेले तेथे पवार साहेबांनी क्या पैसा लाया की नही, आधे घंटे मे अभी कितना तुम बोलना साडे तीन है, अभी उसके पास है पुरा पाच है ना, असे म्हणाले.

त्यांनतर दहा ते पंधरा मिनीटांनी मी पुन्हा पोलीस ठाणेच्या आवारात माझा मुलगा व पंच थांबलेल्या ठिकाणी आलो व मुलगा रोहीत व पंच यांना घेवून पुन्हा पवार साहेब बसलेल्या इमारतीच्या दुस–या मजल्यावरील रुममध्ये गेलो. तेथे गेल्यानंतर ''दोन्ही पार्टीचा भविष्याचा विचार करुन कोणतीही कारवाई करत नसल्याचे'' सांगुन पवार साहेबांनी माझ्या मुलाचा घेतलेला मोबाईल व कागदपत्र माझ्या मुलाच्या ताब्यात दिली. त्यांनतर पवार साहेबांनी पंच सौ. चव्हाण यांना बाहेर जाण्यास सांगीतल्याने त्या बाहेर गेल्या त्यानंतर अभी क्या है वो जमा कर दो असे पवार साहेब म्हणाले व माझे मुलास मोबाईलसह पोलीस ठाणेत थांबवून ठेवून मला पैसे आणण्याकरीता सांगितले.

त्यानंतर मी व पंच पुन्हा बालाजी स्पेशालीटी हॉस्पिटल, साकीविहार रोड, साकीनाका येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो. पोनि वचकल यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक पवार साहेब यांनी पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व पवार साहेबांनी लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझेकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. ३,५००/– (रू. ५००/– दराच्या ७ भारतीय चलनी नोटा) स्वत:चे ताब्यात घेतल्या. सदर नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन ॲन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पो.नि. वचकल यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझा चेहऱ्यावर लावलेला मास्क दोन्ही हातांनी काढुण तोंड पुसावे असा पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगुन पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहाथ पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पोलीस वाहनातच पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस ॲन्थ्रासीन पावडर लावली व माझे शर्टचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच सौ. चव्हाण यांचेसह सापळा कारवाईकरीता पवार साहेब यांचे भेटीकरीता साकीनाका पोलीस ठाणे येथे पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी व पंच साकीनाका पोलीस ठाणेच्या आवारात पोहचलो व साकीनाका पोलीस ठाणेस लागुन असेलेल्या इमारतितील दुस–या मजल्यावरील पवार साहेब बसलेल्या रुमचा दरवाज्यावर टकटक करुन दरवाजा उघडला असता पवार साहेबांच्या समोर काही व्यक्ती बसल्या असल्याने मी व पंच पुन्हा इमारतीच्या खाली आलो व

समक्ष,

( मानसिंग वचकल )
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with CamScanner

फिर्यादी श्री. श्रीराम बालचंद्र कनोजिया यांचा दि. २२/०२/२०२२ रोजीचा जबाब पुढे चालू......

पुन्हा १० ते १५ मिनींटांनी पवार साहेब बसलेल्या रुमच्या दरवाज्यावर टकटक करुन दरवाजा उघडला असता पवार साहेबांनी आत येण्यास सांगीतल्याने मी व पंच आतमध्ये गेलो तेव्हा पवार साहेबांनी माझेकडे व पंचांकडे विचारपुस करुन मी तुमच्या मुलाला मोबाईल व कागदपत्रे परत केली आहेत, तुमच्या मुलाने तुम्हाला कळविले नाही का असे सांगुन पंच सौ. चव्हाण यांना बाहेर थांबण्यास सांगीतले. त्यानंतर पवार साहेब मला 'क्या हुआ क्या है क्या, अं इतना ही, चल ठिक है, पंचनामा रख दे वहॉपर ठिक है,' असे म्हणाले. तेव्हा मी माझेकडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. ३,५००/- (रू. ५०० दराच्या ७ भारतीय चलनी नोटा) मी माझ्या डाव्या हाताने पॅन्टच्या डाव्या खिशातून काढून पवार साहेब यांचे समोर केली असता त्यांनी सदरची रक्कम उजव्या हाताने ताब्यात घेवून त्याचे पॅटचे उजव्या खिशामध्ये ठेवली. त्यांनतर मी पवार साहेबाचे रुमचे बाहेर आलो असता तेथे उभे असलेले पंचासह मी इमारतीच्या खाली आलो व मी सापळा पथकास दिसेल अशा रीतीने माझा चेहऱ्यावर लावलेला मास्क दोन्ही हातांनी काढून चेहरा पुसून सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी मी पुन्हा पोलीस पथकासह तात्काळ पवार साहेब बसलेल्या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावर गेलो व पवार साहेब ज्या रुममध्ये बसले होते तो रुम मी पोलीसांना दाखविला असता पोलीसांनी सदर रुमचा दरवाजा उघडून आतमध्ये प्रवेश करुन रुमची पाहणी केली असता तेथे पवार साहेब आढळून आले नाहीत. पंचांसमक्ष संपुर्ण रूमची पाहणी केली असता लाचेची रक्कम मिळून आली नाही. पोलीस पथकाने सदर मजल्यावर असलेल्या इतर मोकळया रुममध्ये देखिल शोध घेतला असता पवार साहेब आढळून आले नाहीत.

दिनांक २०/०२/२०२२ रोजी माझ्या घरासमोर झालेल्या भांडणामध्ये माझा मुलगा राहुल यास डोक्यास मार लागल्याने आम्ही तक्रार देणेकरीता साकीनाका पोलीस ठाणे येथे गेलो असता तेथिल पवार साहेबांनी आम्हाला रात्रभर पोलीस ठोणेस बसवून, आमची कोणतीही तक्रार नोंद न करता माझ्या मुलाचा मोबाईल माझ्याकडून घेवून "दस हजार रुपया लेके आओ और मोबाईल लेके जावो" असे सांगून आज दि. २२/०२/२०२२ रोजी रू. ५,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. ३,५००/- लाच रक्कम स्विकारुन, तात्काळ तेथून लाचेच्या रकमेची विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने लाचेच्या रकमेसह पळुन गेला म्हणुन माझी त्याचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे पवार साहेब यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मला मराठीतुन वाचून हिंदीतून समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( मानसिंग वचकल )
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with CamScanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ निरंक
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ –
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) –

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ –
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील बुद्धुस मोजी, वेत्री व ठिकाणी फिर्यादी यांचे राहते घरी जवळ झालेल्या आईजान त्यांचा मुलगा नामे राहुल यांचे डोक्यावर दुखापत झाल्याने त्याची तक्रार देण्याकरीता फिर्यादी हे मुलासह कोनाका पो.ठाणे येथे आले असता यातील आरोपी पोउनि प्रविणकुमार सुरेश पवार यांनी कोणतीही तक्रार नोंद न करता त्यांना रात्रभर पो. ठाण्यात बसून ठेवले व त्यांचा मुलगा नामे राहुल यांना सोडले फिर्यादी यांच्याकडून काढून घेवून तो परत असल्याबाबत रु. 10,000/- लाचेची मागणी केली व तडजोडअंती रु. 3500/- ची लाचेची रक्कम स्विकारून तात्काळ लाचेच्या रकमेसह पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने पळून गेला म्हणून भ्र. प्रति. अधि 1988 चे कलम 7 सह भादवि कलम 201 अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, –
........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ –, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........
District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ........ मानसिंग वचकल
पदनाम Rank........ पो. नि.
तपासिक अं. चा कोड क्र. ला. प्र. वि., मुंबई
Posting
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner